**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – लक्ष्मण काशिनाथ माळी,

वय – ४० वर्षे, व्यवसाय– काही नाही,

राहणार – नेवासा बु., ता. नेवासा, जि. अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरू–**

१. मी आरोपीला ओळखतो. घटना साधारण दोन ते अडीच वर्षांपुर्वी सायंकाळी ०६.१५ च्या दरम्यान नाथबाबा चौक येथे अर्चना हॉटेल समोर घडली. त्यावेळी मी माझी मोटारसायकल क्रमांक एम.एच. १७– ६३६३ यावरून नेवासा खु. येथून नेवासा बु. येथे माझ्या घरी जात होतो. त्यावेळी श्रीरामपूर कडून अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो क्रमांक एम.एच.१७–५६८२ हा समोरून भरधाव वेगाने आला व माझ्या मोटारसायकलला उजव्या बाजूला येवून धडक दिली. त्यामुळे मी खाली पडलो. माझा उजवा पाय मोडला. गाडीचे नुकसान झाले. मी माझ्या नातेवाईकांना फोन केल्यानंतर ते आले व त्यांनी मला लोखंडे हॉस्पीटल मध्ये नेले. अपघातानंतर टेम्पो घटनास्थळी होता. दवाखान्यात दोन दिवसांनी माझ्या पायाचे ऑपरेशन झाले. दवाखान्यात पोलीसांनी माझा जबाब घेतला. तो मला वाचून दाखवल्यानंतर मी त्यावर सही केली. आता मला तो जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी १३** देण्यात येते. मी पुर्वी आरोपीकडे मजूरीचे काम केलेले असल्यामुळे मी त्याला ओळखतो. मी माझ्या बाजूने जात असतांना आरोपीच्या चुकीमुळे अपघात

घडला. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. बी. आर. गव्हाणे यांच्या मार्फत सुरू.**

२. मी अपघातापुर्वी मोलमजूरीचे काम करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा ते श्रीरामपूर हा २० ते २५ फूट रूंदीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूला टप–या व दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे रस्त्यावर नेहमी गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, तो रस्ता वर्दळीचा असल्यामुळे तेथे भरपूर साधने ये–जा करतात. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्यावर गर्दी असल्यामुळे वाहने हळू चालतात. मोटारसायकल माझ्या मालकीची आहे. घटनेच्या वेळी माझ्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नव्हता. पोलीसांनी माझा जबाब दिनांक १६.०३.२०२३ रोजी घेतला. एकदाच माझा जबाब घेतला. अपघातानंतर मी बेशुध्द नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून पोलीस ठाणे ८०० ते १००० फूट अंतरावर आहे. मी दवाखान्यात असतांना ऑपरेशन झाल्यानंतर फिर्याद दिली.

३. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील टेम्पो प्रवरा पशुखाद्य या दुकानापाशी उभा होता. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील टेम्पो प्रवरा पशुखाद्य या दुकानापाशी नेहमी उभा असतो. हे म्हणणे खरे नाही की, मला टेम्पोने धडक दिली नाही, मी स्वतःच मोटारसायकलवरून पडलो. हे म्हणणे खरे नाही की, मी उभा असलेल्या टेम्पोवर खोटा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नुकसान भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पुर्वी आरोपीकडे कामासाठी जात असतांना त्यावेळी झालेल्या वादावरून खोटी

फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या टेम्पोने मला धडक दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी फिर्याद दाखल केली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/-**
**(संध्या यु. सुळ)**

दिनांक- १५/०९/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा